दै. गोदातीर दि. 30.09.2019

गोदातीर समाचार 30/09/19

# रामतीर्थ पोलीस पथकाने तांदूळ नेणारा आयचर टेम्पो पकडला

**शंकरनगर** – देगलूर-नरसी राज्य महामार्गावर देगलूरकडून नांदेडकडे तांदूळ घेऊन जाणारा आयचर टेम्पो नरसी पोलीस चौकीजवळ गस्तीवर असलेल्या रामतीर्थ पोलिसांनी पकडून हा तांदूळ शासनाचा की नेमका कुणाचा या बाबद तपासणी करण्यासाठी नायगाव तहसीलला कळवले असून या बाबद वरिष्ठांच्या आदेशानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल असे पोलिसांनी सांगितले.

शासनाचा गहू व तांदूळ मोठ्या प्रमाणात काळ्या बाजारात विक्रीसाठी नरसी पोलीस चौकी- पासून जातो. मात्र सध्या होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका समोर असल्याने प्रशासनाने अनेक ठिकाणी पोलीस व अन्य प्रशासकीय अधिकारी यांचे पथक स्थापन केले आहे. पथक प्रत्येक वाहनांची तपासणी करीत असताना २९ सप्टेंबर रोजी पहाटे सहाच्या सुमारास देगलूरकडून नांदेडकडे पन्नास किलोची एकसे साठ पोते असलेला जवळपास अंशी क्विंटल तांदूळ घेऊन




जाणारा आयचर टेम्पो क्र.एम.एच.४६ एफ- ४८७३ हा मिळून आला आहे. नेमका हा तांदूळ शासनाचा की अन्य कुणाचा या बाबद तपासणी करण्यासाठी नायगाव येथील तहसीलला कळविण्यात आले असून हा आयचर टेम्पो रामतीर्थ पोलीस ठाण्यात लावण्यात आला आहे.